Letter to all members 17th Jan 1987

हिन्द मजदूर किसान पंचायत (महाराष्ट्र)


दूरध्वनी क्र. ३५५३३६-७

२०४, राजा राममोहन रॉय मार्ग
गिरगाव, मुंबई: ४०० ००४:


दिनांक - १७ जानेवारी, १९८७.

२१, २२ फेब्रुवारी १९८७ रोजी राज्य अधिवेशन

प्रिय साथी,

काल, दिनांक १६ जानेवारी १९८७ रोजी जाता केन्द्र ताडदेव, मुंबई: ४०० ०३४ येथे झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार राज्य अधिवेशन दिनांक २८-२९ मार्च, १९८७ रोजी घेण्याचे नक्की करण्यांत आलेले होते. परंतु २१/२२ फेब्रुवारी, १९८७ रोजी कानपूर येथे होणारे रेल कर्मचाऱ्यांचे अधिवेशन (परिषद) रद्द झाल्याचे समजल्याने राज्य अधिवेशन २८-२९ मार्च ऐवजी दिनांक २१-२२ फेब्रुवारी, १९८७ रोजी वसई (जि. ठाणे) येथे घ्यावे असे अखिल भारतीय हिन्द मजदूर किसान पंचायतचे अध्यक्ष साथी जॉर्ज फर्नांडिस यांनी सांगितलेले आहे.

त्यानुसार राज्य अधिवेशन दिनांक २१/२२ फेब्रुवारी, १९८७ रोजी वसई येथे घेण्याचे नक्की झालेले आहे. आपण व आपले सहकारी ह्या अधिवेशनास उपस्थित राहतील, असे पहावे.

आपल्या विभागांत हिन्द मजदूर किसान पंचायतच्या विद्यमाने गेल्या सुमारे अडीच वर्षात म्हणजेच जून १९८४ ते जानेवारी १९८७ ह्या कालावधींत झालेल्या सर्व कार्यक्रमांची तपशीलवार माहिती पाठवावी, अशी विनंती आहे.

आपणाकडून येणाऱ्या माहितीचा अधिवेशनांत सादर करावयाच्या अहवालात उल्लेख करावयाचा असल्याने आपणाकडून सविस्तर माहिती शक्य तितक्या लवकर श्री. शंकर साळवी, सरचिटणीस, हिन्द मजदूर किसान पंचायत (महाराष्ट्र) २०४, राजाराम मोहन रॉय मार्ग, गिरगाव, मुंबई: ४०० ००४ ह्या पत्त्यावर पाठवावी, अशी विनंती आहे.

धन्यवाद.

क्रांतिकारी अभिवादनासह,

आपला साथी
(signature)
( शंकर साळवी )
सरचिटणीस

प्रति:

---
---
---